**कृपया प्रकाशनासाठी-** **19 नोव्हेंबर 2009**

**माजी केंद्रिय मंत्री आणि भाजपा नेते श्री.राम नाईक**
**यांनी 19 नोव्हेंबर रोजी मुंबईत पत्रकार परिषदेत प्रसिध्द केलेले निवेदन**

## *मनोरी खाडीवर 'केबल स्टेड पूल ' कशासाठी ? कोणासाठी ?*
## *राम नाईक यांचा सवाल*

**मुंबई, गुरुवार :** "मार्वे - मनोरी खाडीवर 200 कोटी रुपये खर्चून 'केबल स्टेड पूल' बांधण्याचा घाट घालून राज्य सरकार कोणाचे भले करु इच्छिते?" असा संतप्त सवाल भारतीय जनता पार्टीचे नेते व माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक आज मुंबईत पत्रकार परिषदेमध्ये केला. "धनदांडग्या बिल्डर्सचे आर्थिक हितसंबंध जपण्यापलिकडे या पुलामुळे कोणाचेही भले होणार नाही. मनोरी, गोराई, उत्तन येथील निसर्ग सौंदर्य आणि पर्यावरण नष्ट होईल, तसेच मच्छीमार आणि शेतकरी यांचे व्यवसाय धोक्यात येतील. त्यामुळे हा पूल आम्ही होऊ देणार नाही," असा निर्धारही श्री.नाईक यांनी व्यक्त केला.

मुंबईच्या उत्तर टोकावरील मनोरी (लोकसंख्या 7,500), गोराई (लोकसंख्या 7,000), उत्तन (लोकसंख्या 30,000) या समुद्र किनाऱ्याच्या गावांतील नागरिकांचे मासेमारी व शेती हे प्रमुख व्यवसाय आहेत. खाडीवर केबल स्टेड पूल बांधल्यास त्याचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होऊन स्थानिकांना त्यांचा पारंपारिक व्यवसाय करणेच अशक्य होईल, असे सांगून श्री. राम नाईक म्हणाले, "गावकऱ्यांची मागणी नसताना ह्या पुलाचा घाट कशासाठी घालण्यात येत आहे याचा खुलासा राज्य सरकारने केला पाहीजे."

मनोरी - गोराईमधील नागरिकांच्या भल्यासाठी हा पूल नसून बांधकाम व त्या प्रकारच्या व्यावसायिकांच्या आर्थिक लाभासाठी हा नियोजित पूल आहे असा थेट आरोप यावेळी श्री.राम नाईक यांनी केला. हा पूल बांधण्याचे ठरवून मनोरी, गोराई, उत्तनचे भूमिपूत्र व बांधकाम आणि अन्य व्यावसायिक यांच्यात रायगड आणि ठाणे जिल्ह्याप्रमाणे एसईझेडचा वाद निर्माण करण्याचे काम मात्र सरकारने केले आहे असेही श्री.नाईक म्हणाले.

"मुंबई शहराचा भाग असलेल्या गोराई - मनोरी येथील नागरिकांना स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पन्नास वर्षे उलटल्यावरही पिण्यासाठी नळाचे पाणी काँग्रेस सरकारने दिले नाही. छोट्या वस्तीसाठी समुद्राखालून पाईप टाकून पाणी पुरविण्यासाठी या सरकारकडे चार कोटी रुपये नव्हते. त्यासाठी मी पेट्रोलियम मंत्री असताना इंडियन ऑईलचे सहकार्य घेऊन एक सामाजिकप्रकल्प म्हणून ते काम करु शकलो. परंतु आता हा 'केबल स्टेड पूल' बांधण्यासाठी सरकारकडे दोनशे कोटी रुपये कोठून आले," असा प्रश्न यावेळी श्री. राम नाईक यांनी उपस्थित केला.

पश्चिम द्रुतगति महामार्ग व स्वामी विवेकानंद मार्ग या दक्षिणोत्तर दोन साखळी मार्गावरील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी हा पूल प्रस्तावित असल्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने त्यांच्या जाहिरातीत म्हटले असले, तरी हे कारण धादांत खोटे आहे. वाहतुकीला या पुलामुळे काय दिलासा मिळणार असे विचारुन या वाहतुकीसाठी आता तिसरा लिंक रस्ताही तयार झाला असल्याचे विस्मरण सरकारला झालेले दिसते, असा टोलाही श्री. नाईक यांनी लगावला.

या शिवाय मार्वे - मनोरी खाडीच्या किनाऱ्यावर भारतीय आरमाराचे 'आय.एन.एस. हमला' आणि लष्कराचे 'हेवी ब्रिज ट्रेनिंग सेंटर' अशी संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची दोन केंद्रे आहेत. तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने किनाऱ्याची धूप थांबवणारी खारफुटी (मॅनग्रोव्ह) मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे या प्रस्तावित पुलाला संरक्षण मंत्रालय आणि केंद्रिय पर्यावरण मंत्रालयाच्या परवानग्या कशा मिळाल्या हा प्रश्न आहे. कीं परवानग्या न मिळताच ही निविदा काढली आहे याचा खुलासाही मुंबई महानगर प्रदेश प्राधिकारणाने केला पाहिजे अशी मागणीही श्री.नाईक यांनी केली. "पर्यावरणाचे व स्थानिकांचे नुकसान करणारा कोणताही पूल आम्ही मनोरी - मार्वे खाडीवर होऊ देणार नाही. त्यासाठी जनजागृती करुन आम्ही उग्र जन-आंदोलन उभारु", असा ईशाराही श्री.राम नाईक यांनी शेवटी दिला.

**(कार्यालय सचिव)**

लोकसत्ता मुंबई; सोमवार, १६ नोव्हेंबर २००९

MMRDA

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

सी - १४ व १५, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१,

दुरध्वनी : २६५९ ४००० / २६५९०००१-०४ फॅक्स : २६५९१२६४

ई-मेल : mmrda@giasbm01.vsnl.net.in वेबसाईट : http://www.mmrdamumbai.org

## अर्हता निश्चित करण्याविषयी आवाहन

## मालाड - मार्वे - मनोरीतर रस्त्यावर मनोरी खाडीवर केबल स्टेड पूलाचे संकल्पन व बांधकाम करणे.

१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मालाड - मार्वे - मनोरीतर रस्त्यावर मनोरी खाडीवर केबल स्टेड पूल बांधण्याचे प्रस्तावित असून सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे २०० कोटी रुपये इतकी आहे.

२) नजीकच्या भविष्यातील वाहतुक सुविधेच्या वाढत्या मागणीच्या अनुषंगाने पश्चिम द्रुतगती महामार्ग व स्वामी विवेकानंद मार्ग या दक्षिणोत्तर साखळीमार्गावरील वाहतुक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने सदर खाडीपूल एक अतिरिक्त किनारी रस्त्याचा पर्याय ठरु शकेल. तसेच या खाडी पुलामुळे भविष्यात भाईंदर ते मनोरी क्षेत्रातील विकासासाठीदेखील फायदा होईल.

३) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुलाच्या बांधकामाचा अनुभव ासलेल्या कंत्राटदारांकडून सदर खाडी पूलाच्या संकल्पन व बांधणीच्या अर्हता निश्चित करण्यासाठी प्रस्ताव मागवित आहे.

४) निविदा संचात नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून कमाल दोन भागीदार असलेली संयुक्त अभिकरणे अनुज्ञेय असतील.

५) पात्रतेकरीता खालील अटी पुर्ण करणारे कंत्राटदार निविदासंच घेण्यास पात्र असतील.

अ) संयुक्त अभिकरणाच्या बाबतीत किमान एक भागीदार सा. बां. विभाग, महाराष्ट्र शासन तथा इतर राज्य शासन / केंद्र शासन /केंद्रीय सां.बा. विभाग/ राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, भारत सरकार/ मुंबई महानगर पालिका यांचेकडे योग्य त्या वर्गात नोंदणीकृत असावा.

ब) कंत्राटदाराने ३१/०३/२००९ पर्यंत संपणाऱ्या मागील ५ वर्षापैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात किमान १६८ कोटी रुपये एवढ्या किंमतीची स्थापत्य कामे केलेली असावीत.

क) मागील ५ वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात कंत्राटदाराने संयुक्त अभिकरणातील प्रमुख भागीदार म्हणून १५०कोटी रुपये किंमतीचे किमान एक स्थापत्य काम यशस्वीरीत्या पूर्ण केलेले असावे.

ड) कंत्राटदाराला किमान २०० मीटर लांबीच्या गाळ्याच्या (दोन पायलॉनच्या मध्य बिंदूमध्ये मोजलेला) समुद्र/ नदी किंवा खाडीवरील केबल स्टेड पूलाच्या (एक्स्ट्राडोस पद्धतीचा नव्हे) बांधकामाचा अनुभव असावा.

ई) संयुक्त अभिकरणाच्या बाबतीत, दोन्ही भागीदारांनी अभिकरणाचा भागीदार म्हणून मागील पाच वर्षापैकी कोणत्याही एका वर्षात किमान २०० मीटर लांबीचा नदीवरील किंवा खाडीवरील किमान एक पूल बांधून पूर्ण केलेला असावा.

६) कोणत्याही शेड्युल/ राष्ट्रीयकृत/ भारतीय शाखा असलेल्या परदेशी बँकेतून मुंबई येथे देय असलेला, **"एमएमआरडी फंड"** यांच्या नावाचा रु. ५०,०००/- फक्त इतक्या रकमेचा डिमांड ड्राफ्ट अथवा पे ऑर्डरसोबत कंत्राटदारांच्या नोंदणीचे प्रमाणपत्र, आयकराचे विवरण पत्र तथा मूल्यवर्धित कराच्या नोंदनिपत्रासह मुख्य अभियंता, यांच्या नावाने अर्ज केल्यास अर्हतेचा निविदा संच मुख्य अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ५ वा मजला, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) येथे दि. २०/११/२००९ ते दि. १४/१२/२००९ दरम्यान कार्यालयीन कामाच्या दिवशी **सकाळी १०.०० ते दुपारी ३.०० या वेळेत** विकत घेता येईल.

७) खाली नमूद केल्याप्रमाणे दोन लिफाफे असलेला अर्हता निश्चितीचा निविदा संच मुख्य अभियंता यांचे कार्यालय, ५ वा मजला, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) येथे **दि.२१/१२/२००९ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत** पोचतील अशा बेताने पाठवाव्यात.

<u>लिफाफा १</u> :- १) कंत्राटदाराचे नोंदणी प्रमाणपत्र, संयुक्त अभिकरणाचे करारपत्र.
२) कंत्राटदाराची पात्रता दर्शविणारे विवरणपत्र (संबंधित संदर्भ जोडावेत)

<u>लिफाफा २</u> :- १) उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ व यंत्रसामुग्री यांचे तपशील
२) प्रस्तावित मांडणी नकाशा
३) प्रकल्पाचे संकल्पन करणाऱ्या पथकाचे तपशील (संरचनात्मक सल्लागार)
४) विहीत मुदतीत काम पूर्ण करण्यासाठी प्रस्तावित पद्धति.
५) कामाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या तंत्रज्ञांच्या पथकाचा तपशील.

८) निविदा पूर्व बैठक मुख्य अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, ५ वा मजला, वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व) यांच्या कार्यालयात **दि. ३०/११/२००९ रोजी दुपारी ३.०० वाजता** घेण्यात येईल.

९) फक्त अर्हताप्राप्त कंत्राटदारांकडून आर्थिक निविदा मागविण्यात येईल.

१०) अर्हता निश्चितीच्या निविदा उघडण्यासाठी अवलंब करावयाची पद्धत :-

१) अर्हता निविदा **दि. २१/१२/२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता** शक्यझाल्यास उघडण्यात येतील.

२) पात्र कंत्राटदारास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नियुक्त केलेल्या तांत्रिक समितीपुढे प्रकल्पाचे सादरीकरण करावे लागेल. तांत्रिक निविदेचे मूल्यांकन खालील मुद्द्यांवरुन करण्यात येईल.

अ) तांत्रिक प्रस्ताव

ब) कंत्राटदाराशी संलग्न असलेले संरचनात्मक/संकल्पनविषयक सल्लागार.

क) कामाचे नियोजन आणि पद्धति.

ड) कामाची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणाऱ्या तांत्रिक अधिकारी / कर्मचाऱ्यांचा अनुभव.

इ) प्रस्तावाचा दृश्य व संरचनात्मक ढाचा.

११) अर्हता निश्चित करण्याची प्रक्रिया संपल्यानंतर १० दिवसाच्या आत आर्थिक निविदा सादर करणे आवश्यक आहे. आर्थिक निविदा फक्त - अर्हताप्राप्त कंत्राटदारांकडून माग विण्यात येतील, ज्याकरीता स्वतंत्र निविदा संच वितरित करण्यात येईल.

१२) अधिक माहितीसाठी कृपया खालील ठिंकाणी संपर्क साधावा

प्रकल्प समन्वक :- एस. एन. भोबे अँन्ड असोसिएट्स प्रा.लि.
युनिट क्र. १०, बँकिंग कॉपलेक्स क्र. २, सेक्टर १९ - ए, वाशी, नवी मुंबई
दूरध्वनी :- ०२२ - २७८३१०७०, फॅक्स :- ०२२ - २७८३११७३

१३) कोणतेही कारण न देता कोणताही किंवा सर्व अर्ज फेटाळण्याचा अधिकार प्राधिकरणाकडे आहे.

***टीप :- सन २००९ ची किंमत काढण्यासाठी ५% प्रतिवर्ष एवढी वाढ गृहीत धरण्यात येईल.***

दिनांक : १३.११.२००९
स्थळ : मुंबई
क्र. : अवि / वि..मुं.पा.सु. प्र. / मनोरी /२००९

(श्री.र.नंदर्गीकर)
मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग